# महाराष्ट्र विधानसभा
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(अ) बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१२ रोजी उत्तारित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री.जयकुमार रावल, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८०६३२ - **"धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत साहित्य खरेदी प्रक्रियेत करण्यात आलेला गैरव्यवहार"**

(ब) तारांकित प्रश्न.

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्रीमती मृणाल केशव गोरे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**मुख्यमंत्री** : महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम, २०१२ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०३१२/प्र.क्र.२२७/पुनर्बांधणी-१/परि-२, दिनांकित २५ जून, २०१२ सभागृहासमोर ठेवतील.

**चार : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम ९७ अन्वये).**

**सहा : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सात : शासकीय विधेयक -**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (व्दितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१२.

**आठ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक १७ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) (क्रमांक १ व २)**

(१) **ॲड.अशोक पवार,** श्री.संजय वाघचौरे वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडून सन २००९ ते २०१२ या कालावधीत अनेक बनावट धरणग्रस्तांना जमीन वाटप होणे, याबाबत विधानसभा सदस्य शिरुर यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक १५ मे, २०१२ रोजीच्या पत्रान्वये व विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक १९ मार्च, २०१२ व दिनांक १६ जानेवारी, २०११ च्या पत्रान्वये चौकशीची मागणी करुनही कोणतीही कार्यवाही न होणे, चासकमान धरणातील बुडीत गाव, चिखलगाव येथील बनावट धरणग्रस्त लुना होना डामसे, मयत वारस धोंडु लुना डामसे व इतर यांची त्यांचे नावे असलेली चिखलगाव येथील जमीन स.नं. ८६ क्षेत्र ३ हे. १८ आर व स.नं.८७ क्षेत्र ४ हे. २२ आर. या दोन्ही गटापैकी काहीच जमीन बुडीत क्षेत्रात गेलेली नसताना संकलन रजिस्टरमध्ये जमीन बुडीत क्षेत्रात गेल्याची खोटी नोंद करुन सदर धरणग्रस्तास मौजे सणसवाडी ता.शिरुर येथील जमीन वाटप करण्यात येणे, मौजे सणसवाडी ता.शिरुर येथील जि.पु.अ. यांचे नावे असलेल्या ग.नं. २७४/२, २८९/२, २८६/२ या जमिनी एल ॲन्ड टी कंपनीस वाटप करण्यात येणे, सदर जमिनी धरणग्रस्तास वाटप केलेल्या असताना ४ वर्षांनी त्या काढून घेवून एल ॲन्ड टी कंपनीस वाटप करण्यात येणे, चिखलगाव येथील धरणग्रस्त बाबू कृष्ण मुके यांची प्रत्यक्ष जमीन पाण्यात फक्त ०.०३ आर गेलेली असताना संकलन नोंदवहीमध्ये ९२ १/२ आर गेलेली आहे असे खोटे दर्शविणे, व त्यांना जि.पु.अ.यांनी जि.पु.अ./चास/एस.आर/१७/२०१० दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० अन्वये कोरेगाव भिमा व शिक्रापूर येथील १ हे. २० आर जमीन वाटप करणे, अशा खोट्या माहितीच्या आधारे जि.पु.अ. श्री.शेळके यांनी देय जमिनीपेक्षा जास्त जमीन वाटप व जमीन बुडीत क्षेत्रात गेली नसली तरी बनावट धरणग्रस्तास जमीन वाटप करणे, जि.पु.अ. श्री.शेळके यांच्या कार्यकाळात अशा अनेक जमिनी वाटपाबाबत नागरीकांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अनेकवेळा तक्रारी करुनही कुठलीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

(२) **सर्वश्री विवेक पंडित,** श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री विवेक पाटील, सुभाष देसाई, विनोद घोसाळकर, उमाजी बोरसे, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री धनराज महाले, दादाजी भुसे, एकनाथराव खडसे-पाटील, ए.टी.पवार, शिरिष कोतवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नाशिक जिल्ह्यातील संपूर्ण गिरणा खोऱ्यासाठी वरदान ठरणारी मांजरपाडा क्र.२ ही वळण योजना गेल्या कित्येक दिवसांपासून शासन स्तरावर प्रलंबित असणे, तापी व गिरणा खोऱ्यात या संदर्भात प्रचंड आंदोलने झालेली असणे, त्यामुळे या प्रश्नाला गंभीर स्वरुपाचे वळण लागल्याने शासनाने त्याची दखल घेवून दिनांक २१ नोव्हेंबर, २००८ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्या उपस्थितीत मंत्रालयातील दालनात बैठक घेवून "मांजरपाडा क्र-२ या योजनेच्या तापी खोऱ्यासाठी त्वरित मंजुरी देण्यात येवून मांजरपाडा

योजनेचे पाणी गोदावरी खोऱ्याला व वांजुळपाडा योजनेचे पाणी तापी खोऱ्याला देवू व दोन्ही कामे एकाच वेळी सुरु करण्यात येतील" असा महत्वपूर्ण निर्णय होणे, मांजरपाडा वळण बंधारा क्र.१ च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळून या योजनेचे काम पूर्ण होत आले असणे, परंतु तापी खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न असलेल्या मांजरपाडा क्र.२ वळण बंधाऱ्यांच्या कामास प्रशासकीय मंजुरी व निधी न मिळणे, यामुळे तापी व गिरणा खोऱ्यात नागरीकांमध्ये प्रचंड प्रमाणात शासनाविरोधात वाढलेला असंतोष, दिनांक २० जुलै, २०११ रोजी मा.पालकमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत १५ दिवसांच्या आत प्रशासकीय मान्यता देवून कार्यवाही करावी असा आदेश होणे व मा.जलसंपदा मंत्री यांनी "सप्टेंबर, ऑक्टोबर, २०११ च्या शेवटी भूमीपूजनाचा कार्यक्रम होईल" असे ठोस आश्वासन देणे, यानंतरही वारंवार पाठपुरावा करुनही काहीच कार्यवाही न होणे, यामुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता मांजरपाडा क्र.२ च्या कामांना तातडीने मंजुरी देवून सदर कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, शासनाने या संदर्भात तात्काळ निर्णय घेण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री प्रताप सरनाईक,** राजन विचारे, एकनाथ शिंदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मिरा-भाईंदर शहराची आजची लोकसंख्या जवळपास १० लाखाच्या आसपास असणे, सद्य:स्थितीत मिरा-भाईंदर शहराला होत असलेला पाणीपुरवठा लोकसंख्येच्या विचार करता अत्यंत अपुरा असणे, तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीही अत्यंत नाजुक असल्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिका स्वत: शहराला पाणीपुरवठाबाबत कोणताही स्वतंत्र उपक्रम राबवू शकत नसणे, मिरा-भाईंदर शहराला पाण्यासारखी अत्यंत जीवनावश्यक असणारी सुविधा मिळणेकरिता शासनाच्या माध्यमातून मिरा-भाईंदर शहराला किमान १५० एमएलडी पाणी वितरीत होणेबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार संबंधितांना तक्रार/निवेदने देऊनही शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी स्थानिक जनतेत शासनाप्रती निर्माण होत असलेली असंतोषाची भावना, सबब, जनमानसात शासनाप्रती निर्माण झालेली साशंकतेची भावना, याकडे शासनाने त्वरीत लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

नऊ : **सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक जाधव, सुरेश लाड, मधु चव्हाण, दिपक केसरकर, अमिन पटेल, मानसिंग नाईक, कालिदास कोळंबकर, डॉ.अनिल बोंडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"शासनाने शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती केलेली असणे, राज्यात आयएएस व आयपीएस या परिक्षेत राज्यातील बरेच विद्यार्थी उत्तीर्ण होत असणे, राज्यातील मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय स्तुत्य असणे, आर्थिक दुर्बल घटकाना शिक्षण देण्यासाठी काही नियमसुध्दा केलेले असणे, राज्यातील शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देत असताना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या जाचक अटींमुळे व त्यांच्याकडून निधी वेळेवर मिळत नसल्यामुळे शिक्षणाचा दर्जा राखण्यास असमर्थ असणे, केंद्र शासनाने नुकताच शिक्षण हक्क कायदा (राइट टू एज्युकेशन) संमत केला असून सर्व राज्यांना याची अंमलबजावणी करण्याचे दिलेले निदेश, या कायद्यानुसार राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे लागणार असणे, प्रत्येक शिक्षण संस्थेत गरीब विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचे शासनाने दिलेले निदेश, परंतु त्यासाठी निधीची व्यवस्था करण्यात आली नसणे, शिक्षण संस्थांना नॉनटिचिंग अनुदान देण्यात न येणे, गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यात होत असलेला विलंब, त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या अडचणी, राज्यात सीबीएसई बोर्डाला मिळत असलेली परवानगी, बरेच विद्यार्थी त्याकडे आकृष्ट होणे, निरक्षरांची वाढत असलेली संख्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात येत असलेल्या अडचणी, शासनाकडून शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणे, त्यामुळे त्यांच्या शिक्षणावर होत असलेला विपरित परिणाम, वार्षिक १ लाख रु.पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना शासनाने सुरु केली असणे, त्याचे नियम जाचक असल्यामुळे त्याचा फायदा गरीब कुटुंबाला मिळत नसणे, राज्यातील खाजगी मोठ्या रुग्णालयात गरीबांसाठी ५ टक्के खाटा राखीव ठेवण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, परंतु याची अंमलबजावणी करण्यास खाजगी मोठ्या रुग्णालयांनी विरोध केल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी सुध्दा न होणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, सर्व शिक्षा अभियान योजनेचा तसेच गोरगरीबांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

दहा : **अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) -**

**सर्वश्री. अस्लम शेख, रमेश सिंग ठाकूर, अमिन पटेल, ॲड.चिंतामण वनगा, सर्वश्री विष्णु सवरा, दौलत दरोडा, बाळा नांदगांवकर, मंगेश सांगळे, आर.एम.वाणी, जितेंद्र आव्हाड, गणपतराव देशमुख, एकनाथराव खडसे (पाटील),वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात अनेक ठिकाणी होत असलेला अवैध वाळू उपसा, मंजूर कोट्यापेक्षा जास्त प्रमाणात तसेच परवानगी नसतानाही सक्शन पंपाद्वारे वाळू उपसली जात असल्याचे निदर्शनास येणे, यामधून शासनाचा बुडत असलेला महसूल, महसूल यंत्रणेचाही यामध्ये सहभाग असल्याची साशंकता, वाळू माफियांचे शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, अवैध वाळू उत्खननामुळे पर्यावरणाला निर्माण झालेला धोका, यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असणे, वाळू माफिया व सहभाग आढळलेल्या शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अकरा : **शासकीय विधेयके -**

**(१) विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**सन २०१२ चे विधान सभा विधेयक क्रमांक २३ - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

**(२) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश : विचार व संमत करणे-**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री देवेंद्र फडणवीस, महादेव बाबर, एकनाथराव खडसे (पाटील), सुधीर मुनगंटीवार, विनोद घोसाळकर, सुभाष देसाई, विवेक पंडित, विवेक पाटील, सुरेश हाळवणकर, शिशिर शिंदे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल राठोड, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, नितीन भोसले, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, प्रविण दरेकर, नानाजी शामकुळे, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, रविंद्र वायकर, प्रकाश (बाळा) सावंत, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, ॲड. आशिष जयस्वाल, सर्वश्री विजयराज शिंदे, संजय राठोड, संतोष सांबरे, संजय (बंडू) जाधव, आर.एम.वाणी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१२ चा अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र जिल्हा पिरषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१२ नापसंत करते."

(ख) **सन २०१२ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२.**

---

**(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(क) **सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, प्रा.अतुल देशकर, सर्वश्री विजयकुमार देशमुख, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, सुधीर पारवे, विजय घोडमारे,महादेव बाबर वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद

विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय औटी, अनिल राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री गिरीष बापट, भिमराव तापकीर, संजय भेगडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राजेश क्षीरसागर, चंद्रदीप नरके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री प्रकाश (बाळा) सावंत, प्रा.शरद पाटील, सुरेशदादा जैन, सुभाष देसाई, आर.एम.वाणी, चिमणराव पाटील, संतोष सांबरे, ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ पवनराजे निंबाळकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, दादाजी भुसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या

संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री विजयराज शिंदे, रुपेश म्हात्रे, विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत, सर्वश्री सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ढ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय (बंडू) जाधव, श्रीमती मीरा रेंगे-पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, अशोक काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री अशोक शिंदे, नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री.धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयक, २०११ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडश : विचार व संमत करणे-**

(क) **सन २०१० चे विधान परिषद विधेयक क्रमांक १४- मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत (सुधारणा) विधेयक, २०१०**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, प्रा.अतुल देशकर, सर्वश्री विजयकुमार देशमुख, संजय राठोड, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, सुधीर पारवे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री महादेव बाबर, विवेक पंडित, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई,वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२६ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रुपेश म्हात्रे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री विजयराज शिंदे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री आर.एम.वाणी, चिमणराव पाटील, संतोष सांबरे, ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ पवन राजेनिंबाळकर, विजय औटी, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, राजन साळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले,वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४- मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीक़डे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ जुलै, २०१२.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.